8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

# महायुती सुऽऽसाट



https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

## सोनियाच्या ताटी, उजळल्या ज्योति...

## वेड्या बहिणीची रे वेडी माया...



| | | | | |
|---|---|---|---|---|
| Won 104665 (+ 31651) अर्जुनराव खोतकर शिवसेना | Won 70659 (+ 4740) बबनराव लोणीकर भाजपा | Won 98496 (+ 2309) हिकमत उढाण शिवसेना | Won 128480 (+ 23179) संतोष दानवे भाजपा | Won 138489 (+ 45531) नारायण कुचे भाजपा |
| Lost 73014 ( -31651) कैलास गोरंट्याल काँग्रेस | Lost 65919 ( -4740) आसाराम बोराडे शिवसेना (उद्धव ठाकरे) | Lost 96187 ( -2309) राजेश टोपे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) | Lost 105301 ( -23179) चंद्रकांत दानवे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) | Lost 92958 ( -45531) बबलू चौधरी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) |
| Lost 30454 ( -74211) अब्दुल हाफिज अपक्ष | Lost 53921 ( -16738) सुरेशकुमार जेथलिया अपक्ष | Lost 23696 ( -74800) सतीश घाटगे अपक्ष | Lost 3699 ( -124781) केशव जंजाळ अपक्ष | Lost 4965 ( -133524) सतीश खरात वंचित बहुजन आघाडी |
| Lost 6322 ( -98343) डेव्हीड घुमारे वंचित बहुजन आघाडी | Lost 29810 ( -40849) रामप्रसाद थोरात वंचित बहुजन आघाडी | Lost 20731 ( -77765) कावेरी खटके वंचित बहुजन आघाडी | Lost 2370 ( -126110) वैशाली दाभाडे अपक्ष | Lost 4574 ( -133915) शैलेंद्र मिसाळ पीपल्स् पार्टी ऑफ इंडीया |

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने गेल्या सहा महिन्यांपासून राजकीय वर्तुळात वातावरण तापल्याचं पाहायला मिळालं होतं. महाविकास आघाडी व महायुती यांच्यात थेट झालेल्या लढतीमध्ये कोण जिंकून येणार? कुणाची पीछेहाट होणार? यावरून मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. विशेषतः सत्ताधारी व विरोधी अशा दोन्ही बाजूंना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांमधील विभक्त झालेले गट असल्यामुळे यावेळच्या निकालांबाबत कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. रविवार (दि २३) निकाल घोषित झाले. या निकालामध्ये भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसेच्या महायुतीने तब्बल २३० जागांवर विजय मिळवित राज्यात सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. तर महाविकास आघाडीने पन्नाशीही गाठता आली नाही. २०२४ च्या या निवडणुकीत महायुती सुसाट निघाली. जालना जिल्ह्यातील पाचही मतदार संघात महायुतीने विजय मिळविला असून जालना विधानसभा मतदार संघात प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांचा शिवसेनेचे अर्जुनराव खोतकर यांनी पराभव केला आहे. तर परतूरात भाजपाचे बबनराव लोणीकरांनी आपला गड राखत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आसाराम बोराडे यांच्यावर मात केली. घनसावंगी मतदार संघात शिवसेनेचे हिकमत उढाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे राजेश टोपे यांच्यावर विजय मिळविला आहे. भोकरदन मतदार संघात भाजपाचे संतोष दानवे हे विजयी झाले असून येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे चंद्रकांत दानवे यांचा पराभवाचा सामना करावा लागला आहे. बदनापूर मतदार संघातील लढत ही तुल्यबळ समजली गेली होती. या ठिकाणाहून बबलू चौधरी यांचा विजय निश्चित मानण्यात येत होता. मात्र, येथे भाजपाचे उमेदवार नारायण कुचे यांनी तिसऱ्यांदा विजय मिळविला आहे.**


महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल आज २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला आहे. या या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीचा मोठा विजय झाला. खरं तर ही विधानसभेची निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी अटीतटीची होईल अशी चर्चा निवडणुकीआधी होती. मात्र, आज निकाल जाहीर झाल्यानंतर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला तर महायुतीने मोठं यश संपादन केले आहे. महायुतीत भाजपाला १३२, शिवसेना (शिंदे) ५७, राष्ट्रवादी (अजित पवार) ४१ जागांवर विजय मिळाल आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीला शिवसेना ठाकरे गटाला २० जागा तर राष्ट्रवादी (शरद पवार) १० जागा आणि काँग्रेसला १६ जागांवर विजय मिळाला आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर अवघ्या पाच महिन्यांत राज्याचे चित्र पूर्णपणे बदलल्याचं या निवडणुकीत पाहायला मिळाले आहे. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील म हायुतीने आघाडीला २८८ पैकी २३० चा टप्पा गाठला आहे.

**सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योति... वेड्या बहिणीची रे वेडी माया या गाण्याप्रम ाणे लाडक्या बहिणींनी वेडी माया जपत मतांचे दान महायुतीच्या पारड्यात टाकले असून आता या बहिणींना महागाई, रोजगार, शेतमाला भाव मिळावा याची भावांकडुन अपेक्षा लागून आहे.** ऐवढ्या मोठ्या प्रमाणा यश मिळाल्याने जबाबदारी वाढली असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली असल्याने येणारे सरकार हे महागाई कमी करण्यासाठी ठोस पावले उचलावित अशी अपेक्षा निर्माण झाली आहे. लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीला महाराष्ट्रात मोठा धक्का बसला होता, तर महाविकास आघाडीला मोठं यश मिळवलं होतं. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत उलट चित्र पाहायला मिळालं. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीच्या सरकारने लाडकी बहीण योजना आणली. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील दोन कोटींहून अधिक महिलांना दर महिन्याला पंधराशे रुपये दिले जातात. त्यामुळे या निवडणुकीत महिला मतदारांचा टक्का वाढला आणि या योजनेचा महायुतीला मोठा फायदा झाला. दुसरीकडे महाविकास आघाडीने त्यांचं सरकार आल्यास तीन हजार रुपये देण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र, काँग्रेसशासित कर्नाटक आणि तेलंगणा सरकारचं उदाहरण देत काँग्रेसशासित राज्यात योजना राबवण्यात अपयशी ठरल्याचा आरोप करत जोरदार प्रचार केला. त्यामुळे महायुतीसाठी लाडकी बहीण योजना निर्णायक ठरल्याचं बोललं जात आहे.

विधानसभेच्या निवडणुकीत पान २ वर


# बंडामुळे फडकला महायुतीचा झेंडा!


## जालना जिल्ह्यातील पाचही मतदार संघात महायुती; खोतकर, लोणीकर, दानवे, उढाण, कुचे विजयी


अर्जुनराव खोतकर


हिकमत उढाण


बबनराव लोणीकर


संतोष दानवे


नारायण कुचे

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील पाचही मतदार संघात महायुतीने विजय मिळविला असून जालना विधानसभा मतदार संघात प्रतिस्पर्धी कॉँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांचा शिवसेनेचे अर्जुनराव खोतकर यांनी पराभव केला आहे. आलटून पालटून आमदार होण्याची परंपरा जालना मतदार संघात कायम राहिली आहे. येथे आ. गोरंट्याल व माजी राज्यमंत्री खोतकर यांच्यात विकास कामांसाठीच्या श्रेयवादावरून बरीच लढाई पहायला मिळाली. तर परतूरात भाजपाचे बबनराव लोणीकरांनी आपला गड राखत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आसाराम बोराडे यांच्यावर मात केली. परतूर मतदार संघाची लढत तिरंगी झाली. या ठिकाणाहून कॉँग्रेसचे बंडखोर सुरेशकुमार जेथलिया यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केल्याने सुरुवातीला लोणीकर आणि जेथलिया अशीच लढत होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, आसाराम बोराडे यांचा जनसंपर्क आणि ठाकरे गटाबद्दलची सहानुभूतीने नंतर ही लढत बोराडे विरुद्ध लोणीकर पहायला मिळाली. निकाला दरम्यान, शेवटच्या काही फेऱ्यांमध्ये कधी लोणीकर पुढे तर कधी बोराडे अखेर शेवटच्या फेरीअंती बबनराव लोणीकर ७०,६५९ मते मिळवत विजय मिळविला. आसाराम बोराडे यांना ६५९१९ इतकी मते मिळाली.

घनसावंगी मतदार संघात शिवसेनेचे हिकमत उढाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे राजेश टोपे यांच्यावर विजय मिळविला आहे.

भोकरदन मतदार संघात भाजपाचे संतोष दानवे हे विजयी झाले असून येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे चंद्रकांत दानवे यांचा पराभवाचा सामना करावा लागला आहे. बदनापूर मतदार संघातील लढत ही तुल्यबळ समजली गेली होती. या ठिकाणाहून बबलू चौधरी यांचा विजय निश्चित मानण्यात येत होता. नारायण कुचे यांच्यावर मतदार संघात नाराजी दिसून येत होती. विकास कामांसाठी १० टक्के कुचे घेतात, तसेच गेल्या दहा वर्षात मतदार संघात विकास झाला नसल्याची ओरड असतांनाही येथे नारायण कुचे यांनी तिसऱ्यांदा विजय मिळविला आहे. जालना व परतूर मतदार संघात काँग्रेसचे बंडखोर अनुक्रमे अब्दुल हाफिज व सुरेशकुमार जेथलिया यांच्यामुळेच महायुतीचा विजय झाला असल्याचे दिसून येत आहे. या बंडामुळे या दोन्ही मतदार संघात महायुतीचा झेंडा फडकला आहे.

**अर्जुन खोतकर विजयी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १०१-जालना मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमंत हारकर यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. १०१-जालना विधानसभा मतदारसंघातून शिवसेना पक्षाचे उमेदवार अर्जुन पंडीतराव खोतकर यांना १,०४,६५४ मते मिळाली. तर इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार कैलास किसनराव गोरंट्याल यांना ७६,०१४ इतकी मते मिळाली. यात शिवसेना पक्षाचे उमेदवार अर्जुन पंडीतराव खोतकर हे ३१,६५१ मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमंत हारकर यांनी अर्जुन पंडीतराव खोतकर यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी निवडणूक निरिक्षक श्री. वेद पती मिश्र, निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमंत हारकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी छाया पवार यांची उपस्थिती होती.

अर्जुन पंडीतराव खोतकर शिवसेना १,०४,६६५, किशोर यादव बोरुडे बहुजन समाज पार्टी ९००, कैलास किसनराव गोरंट्याल इंडियन नॅशनल काँग्रेस ७३,०१४, असद उल्ला शेख अमान उल्ला शहा- सोशल डेमोक्रेटीक पार्टी ऑफ इंडिया ८६९, डेव्हीड प्रल्हादराव घुमारे वंचीत बहुजन आघाडी ६,३२२, निला गौतम काकडे विकास इंडिया पार्टी, १३१ मिलींद बालू बोर्डे बहुजन रिपब्लीकन सोशलीस्ट पार्टी ३६३, ॲड. योगेश दत्तु गुल्लापेल्ली ऑल इंडिया फॅारवर्ड ब्लॉक ९२, विकास छगन लहाने पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डे.) १४९, विजय पंडितराव वाडेकर संभाजी ब्रिगेड पार्टी १३१, विनोद राजाभाऊ मावकर राष्ट्रीय समाज पक्ष ९८, अनवर कुरेशी सलीम कुरेशी अपक्ष, १०८, अनिस शमशोद्दीन सय्य्द अपक्ष १५७, अफसर फरीद शेख चौधरी अपक्ष ५२८, अब्दुल हफीज अब्दुल गफार अपक्ष ३०,४५४, अर्जुन दादा पाटील भांदरगे अपक्ष ९८५, अर्जुन सुभाष कणिसे अपक्ष ६८८, अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहर पांगारकर अपक्ष २,२२७, आनंदा लिंबाजी ठोबरे अपक्ष २७०, कुंडलिक विठ्ठल वखरे अपक्ष ११८, गणेश दादाराव कावळे अपक्ष १०८, योगेश सखाराम कदम अपक्ष १०३, रतन आसाराम लांडगे अपक्ष ५१, विशाल लक्ष्मण हिवाळे अपक्ष १२३, सपना विनोद सुरडकर अपक्ष १०१, ॲड. संजय रघुनाथ रौंदळे अपक्ष ३७२, नोटा ८१३.

**बबनराव लोणीकर विजयी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी ९९-परतूर मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील जवाहर नवोदय विद्यालय, अंबा, ता. परतुर येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. ९९-परतूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना ७०,६५९ मते मिळाली. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे. पाटील) यांना ६५,९१९ इतकी मते मिळाली. यात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) हे ४,७४० मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रतिभा गोरे यांची उपस्थिती होती.

अहेमद महमद शेख बहुजन समाज पार्टी ६९२, आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे. पाटील ) शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे ) ६५९१९, बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) भारतीय जनता पार्टी ७०६५९, आसाराम सखाराम राठोड पीपल्स पार्टी ऑफ इंडीया (डे.) १२७९ कृष्णा त्रिबंकराव पवार ऑल इंडीया हिंदुस्थान काँग्रेस पार्टी १०४५, जाधव श्रीराम बन्सीलाल जय सेवालाल बहुजन विकास पार्टी ८०२, रामप्रसाद किसनराव थोरात वंचीत बहुजन आघाडी २९८१०, अग्रवाल मोहनकुमार हरिप्रसाद अपक्ष १६३३, अजहर युनुस शेख अपक्ष, ८१२, जेथलिया सुरेशकुमार कन्हैयालाल अपक्ष ५३९२१, नामदेव हरदास चव्हाण अपक्ष ९९७, नोटा ११६३.

**संतोष दानवे विजयी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १०३-भोकरदन मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील नगर परिषद मंगल कार्यालय, भोकरदन येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. दयानंद जगताप यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टी पक्षाचे उमेदवार दानवे संतोष रावसाहेब यांना १,२८,४८० मते मिळाली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार चंद्रकांत पुंडलीकराव दानवे यांना १,०५,३०१ इतकी मते मिळाली. यात भारतीय जनता पार्टी पक्षाचे उमेदवार दानवे संतोष रावसाहेब हे २३,१७९ मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. दयानंद जगताप यांनी दानवे संतोष रावसाहेब यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. दयानंद जगताप, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष बनकर, यांची उपस्थिती होती.

चंद्रकांत पुंडलीकराव दानवे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार १,०५,३०१, दानवे संतोष रावसाहेब भारतीय जनता पार्टी १,२८,४८०, राहुल जांलिदर छडीदार बहुजन समाज पार्टी ८७०, ॲड. साहेबराव माधवराव पंडीत हिंदुस्तान जनता पार्टी ३५७, मयुर रमेशराव बोर्डे स्वाभीमानी पक्ष, ४९३ दिपक भिमराव बो-हाडे वंचित बहूजन आघाडी २,०३१, दिगंबर बापुराव क-हाळे, भारतीय वीर किसान पार्टी १६७, विकास विजय जाधव महाराष्ट्र स्वराज्य पार्टी ५२८, ॲड. शिरसाठ फकीरा हरी पिपल्स पार्टी ऑफ इंडीया (डे.) ९८, गजानन सिताराम बर्डे भारतिय आदिवासी पार्टी ३५१, अंजली संधु भुमे

ऑल इंडीया फॉरवर्ड ब्लॉक १२०, सुनिल लक्ष्मणराव वाकेकर विदूथलाई विरुथलाईगल काटची १०५, सुनिल गिनाजी इंगळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डे), १०८, रवी विजयकुमार हिवाळे अपक्ष १८९, कडूबा म्हातारबा इंगळे अपक्ष ५८८, यासीन सलिम मदार अपक्ष ७१, केशव रामकिशन देठे, अपक्ष १,५४४, केशव आनंदराव जंजाळ अपक्ष ३,६९९, योगेश पाटील शिंदे अपक्ष ६९, वैशाली सुरेश दाभाडे अपक्ष २,३७०, महादू लक्ष्मण सुरडकर अपक्ष १५२, कैलास रामदास पाचगे अपक्ष १,११५, गणेश रतन साबळे अपक्ष १८९, नासेर दाऊद शेख अपक्ष १२७, रफीक अब्बास शेख अपक्ष ९०, चंद्रशेखर उत्तमराव दानवे, अपक्ष १०३, अकबर अली अकरम अली खान अपक्ष १३३, जगन तुकाराम लोखंडे, अपक्ष ३९, शिवाजी आत्माराम भिसे, अपक्ष ५१९, निलेश बलीराम लाथे अपक्ष १६१, जगदीश दिलीप राऊत अपक्ष ७३, दिवाकर कुंडलिक गायकवाड अपक्ष ६८, नोटा ७२७.

**हिकमत उढाण विजयी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १००-घनसावंगी मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघातून शिवसेना पक्षाचे उमेदवार उढाण हिकमत बळीराम यांना ९८,४९६ मते मिळाली. तसेच नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांना ९६,१८७ इतकी मते मिळाली. यात शिवसेना पक्षाचे उमेदवार उढाण हिकमत बळीराम हे २,३०९ मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे यांनी उढाण हिकमत बळीराम यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी निवडणूक निरिक्षक निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी योगिता खटावकर यांची उपस्थिती होती.

उढाण हिकमत बळीराम शिवसेना ९८,४९६, जायभाये दिनकर बाबुराव बहुजन समाज पार्टी ८७४, राजेशभैय्या टोपे नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ९६,१८७, कावेरी बळीराम खटके वंचित बहुजन आघाडी २०,७३१, बाबासाहेब संतुकराव शेळके समता पार्टी ४,८३०, रमेश मारोतराव वाघ राष्ट्रीय समाज पक्ष २१७, विलास महादेव वाघमारे, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक १०९, शाम कचरु साळवे बहुजन भारत पार्टी ५५४, आप्पा आन्रा झाकणे अपक्ष १८३, उगले गजानन रामनाथ अपक्ष १४२, उढाण सतिश गणपतराव अपक्ष २८८, घाटगे सतिश जगन्नाथराव अपक्ष २३,६९६, चोथे शिवाजी कुंडलीकराव अपक्ष २,३२४, दिनकर उघडे अपक्ष १,७८५, निसार पटेल अपक्ष ६५४, पवार ज्ञानेश्वर प्रतापराव अपक्ष ८२८, बाबासाहेब पाटील शिंदे अपक्ष १,०९० ॲड. भास्कर बन्सी मगरे अपक्ष २५९, राजेंद्र बबनराव कुरणकर अपक्ष १,०८८, रामदास आश्रुबा तौर अपक्ष १,०४२, विलास आसाराम कोल्हे अपक्ष १४४, श्रीहरी यादवराव जगताप अपक्ष १५१, सतिश मधूकर घाडगे अपक्ष १३१, नोटा ४८६.

**नारायण कुचे विजयी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १०२-बदनापूर मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील कृषि महाविद्यालय, बदनापूर येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी सरिता सुत्रावे यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. १०२-बदनापूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टी पक्षाचे उमेदवार कुचे नारायण तिलकचंद यांना १,३८,४८९ मते मिळाली. नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बबलु नेहरुलाल चौधरी यांना ९२,९५८ इतकी मते मिळाली. यात भारतीय जनता पार्टी पक्षाचे उमेदवार कुचे नारायण तिलकचंद ४५,५३१ मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी सरिता सुत्रावे यांनी कुचे नारायण तिलकचंद यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सरिता सुत्रावे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी डमरे यांची उपस्थिती होती.

कुचे नारायण तिलकचंद भारतीय जनता पार्टी १,३८,४८९, बबलु नेहरुलाल चौधरी नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ९२,९५८, अन्ना साईनाथ चिन्नादोरे स्वाभिमानी पक्ष १,०५०, आदमाने दिनेश दत्तात्रय, रिपब्लिकन सेना, ४२०, कटके जयश्री संजय महाराष्ट्र स्वराज्य पार्टी ४६१, नाडे ज्ञानेश्वर दगडुजी, ऑल इंडिया फारवर्ड ब्लॉक ३०७, शैलेंद्र सुदाम मिसाळ पिपल्स पार्टी ऑफ इंडीया (डेमोक्रेटीक) ४,५७४, सतिश शंकरराव खरात वंचीत बहुजन आघाडी ४,९६५, संदीप आसाराम गवळी समता पार्टी १३८, काकासाहेब बाबुराव भालेराव अपक्ष ६०८, गायकवाड संगिता अंकुश अपक्ष २५३, चाबुकस्वार राहुल निरंजन अपक्ष १५९, बाबासाहेब हरिभाऊ खरात अपक्ष २०९, राजेश ओंकारराव राऊत अपक्ष ४९३, सचिन विलकिसन कांबळे, अपक्ष ९१६, सौ. सुश्मिता सुभाष दिघे अपक्ष १,२४२, ॲड. संतोष काशिनाथ मिमरोट अपक्ष १,१४५, नोटा १,१२२.

संपादकीय पान

## थोर शास्त्रज्ञ

थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस हे भारताचे पहिले जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ व वनस्पतीशास्त्रज्ञ होते. जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींमध्ये देखील प्राण्यांप्रमाणे संवेदना असतात हे हे प्रयोगाद्वारे सिद्ध केले. ऊन, पाऊस, थंडी, प्रकाश, ध्वनी यामुळे प्राण्यांप्रमाणे वनस्पतींमध्येही संवेदना निर्माण होतात हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी सेस्कोग्रफ नावाचे यंत्र बनवले. या यंत्राने वनस्पतींची संवेदना दहा हजार पटीने मोठी करून बघता येणे शक्य झाले. सेस्कोग्राफ हे यंत्र वनस्पती शास्त्रसाठी वरदान ठरले. जगदीशचंद्र बोस यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ रोजी बंगालमधील ( आताच्या बांगलादेशातील ) मैमनसिंग येथे झाला त्यांचे वडील भगवानसिंग बोस हे सरकारी अधिकारी होते. लहानपणापासूनच जगदीशचंद्र बोस यांना आजूबाजूचा निसर्ग पाहायचे, त्याचे निरीक्षण करण्याची आवड होती. झाडे, पाने - फुले, प्राणी, पक्षी, फुलपाखरे यांचे निरीक्षण करणे हा त्यांचा आवडता छंद होता. जगदीशचंद्र बोस यांचे प्राथमिक शिक्षण गावातल्या शाळेत झाले. कोलकोता येथील सेंट झेवियर्स कॉलेजमधून इंटर मीडियट होऊन, कोलकोता युनिव्हर्सिटी मधून भौतिकशास्त्र व डॉक्टरकीचा अभ्यास करून इंग्लंडच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन, वनस्पतीशास्त्र व निसर्गशास्त्र यांचा अभ्यास करून भारतात परतले. १८८५ साली ते भारतात परतल्यावर कोलकोत्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये भौतिकीच्या प्राध्यापक पदावर रुजू झाले. या पदावर रुजू होणारे ते पहिलेच भारतीय असल्यामुळे त्यांना वर्णभेदाला तोंड द्यावे लागले; पण काही वर्षांनंतर त्यांची योग्यता ओळखल्यावर असामान्य शास्त्रज्ञात त्यांची गणना होऊ लागली. १८८५ ते १८९५ या काळात भौतिकशास्त्र शिकवत असताना त्यांनी विद्युत शक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरांगाचा शोध लावून त्यांनी बॅटरी बनवली. या शोधाची कीर्ती जगभर पसरली. प्रसिद्ध शास्त्रज्ञ पोईनकर आणि जे. जे. थॉम्पसन यांच्या लेखात या शोधाचा उल्लेख आहे. नेमलाईटच्या मदतीने संदेश पाठवण्यातही त्यांना यश मिळाले. विद्युत शक्तिवरील संशोधनानंतर जगदीशचंद्र बोस वनस्पती शास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूंमधील साम्य आणि भेद यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी या विषयावर लिहिलेल्या निबंधांना व दिलेल्या व्याख्यानांना सुरवातीला व्यापक मान्यता मिळाली नाही. १९०१ मध्ये त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीला या विषयावर सादर केलेले निबंध स्वीकारण्यात आले नाही. याचे अंशतः कारण म्हणजे त्यांनी या विषयाचे तत्वज्ञानात्मक विवरण केले होते. तथापि वनस्पतींच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी योजलेल्या वनस्पतींच्या अतिसूक्ष्म हालचालींची नोंद करणाऱ्या अतिशय संवेदनशील स्वयंचलित उपकरणाबद्दल आणि या उपकरणाच्या सहाय्याने त्यांनी विविध उद्दीपनांमुळे होणाऱ्या वनस्पतींतील सूक्ष्म बदलांविषयी सातत्याने जमा केलेल्या माहितीबद्दल त्यांची कीर्ती जगभर पसरली. वनस्पतींच्या वाढीचे दहा हजार पट विवर्धन करू शकणारे सेस्कोग्राफ हे स्वयंचलित यंत्र त्यांनी तयार केले होते. या उपकरणाच्या साहाय्याने बोस यांनी वनस्पतींनाही संवेदनग्रह क्षमता असते, हे प्रयोगाद्वारे सिद्ध करून दाखवले. वनस्पती अन्न ग्रहण करतात, रात्री लवकर झोपतात, सकाळी लवकर उठवतात, मनुष्याप्रमाणे वनस्पतींचाही जन्म, विकास आणि मृत्यू होतो हे जगदीशचंद्र बोस यांनी सिद्ध केले. वनस्पती शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी क्रेस्कोग्राफ, रेझोनंट रेकॉर्डर, एसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाउंड लेव्हलर, बसलिंग ओपरेट्स , इत्यादी उपकरणे त्यांनी तयार केली. १९२० साली त्यांना रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळाली. सण १९३६ मध्ये त्यांनी कोलकोत्यात बोस इन्स्टिटयूट रिसर्च ची स्थापना केली. संस्थेचे मुखपत्रही सुरू केले. जगदीशचंद्र बोस यांनी इरीटेबीलिटी ऑफ प्लॅन्टस्, इलेक्ट्रोफीजिओलॉजी ऑफ प्लॅन्टस. ट्रॉपीक मुव्हमेंट अँड ग्रोथ ऑफ प्लॅन्टस्, द नर्व्हस मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस्, प्लॅन्टरिस्पॉन्स १९०६, लाईफ मुव्हमेंट प्लॅन्टस् ( भाग १ ते ४ ) द फिजीऑलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, मोटार मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस्,



रिस्पॉन्सेस इन द लिव्हिंग अँड नॉन लिव्हिंग १९०६ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. केंब्रिज विद्यापीठाने त्यांना १८९६ मध्ये डी एस सी पदवी दिली. द रॉयल सोसायटीने त्यांना १९२० मध्ये सदस्यत्व बहाल केले. ब्रिटिश सरकारने १९१७ मध्ये त्यांना नाईट हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. जगदीशचंद्र बोस अत्यंत देशाभिमानी शास्त्रज्ञ होते. भारतीयांनी आपल्या महान सांस्कृतिक परंपरेत वैज्ञानिक संशोधन करून भर घालावी, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी कोलकोता विद्यापीठात आणि नंतर बोस रिसर्च इ्स्टिट्यूटमध्ये संशोधनाला अतिशय प्रोत्साहन दिले. जगदीशचंद्र बोस यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी २३ नोव्हेंबर १९३७ रोजी बंगालमधील ( आता बिहारमधील ) गिरिडी येथे निधन झाले. जगदीशचंद्र बोस म्हणजे संशोधन, ज्ञाननिष्ठा, प्रयोगशीलता, चिकाटी, दातृत्व व देशभक्तीचा अंतिम शब्द.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब जालनाच्यावतीने क्लब सदस्य लॉ. ममता भरत मंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त जुना जालना विभागातील सराफनगर येथील डॉ. कुलकर्णी क्लिनिकमध्ये आयोजित मोफत नेत्रा तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सराफनगर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर या शिबिराचा लाभ घेतला. तपासणीदरम्यान आवश्यकता असलेल्या गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात आले, ज्यामुळे अनेकांना दृष्टी सुधारण्यास मदत झाली. तसेच मोतीबिंदू आढळलेल्यांपैकी पाच रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. त्यांच्यावर चिकलठाणा येथील लॉन्स आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

पान १ वरुन

## महायुती सुसाट ...

जाती आणि धर्माचे मुद्देही गाजले. यामध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाराष्ट्रात 'बटेंगे तो कटेंगे' अशी घोषणा दिली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ए है तो सेफ है' ही घोषणा दिली होती. त्यामुळे 'बटेंगे तो कटेंगे', 'ए है तो सेफ है' अशा घोषणांनी राज्य ढवळून निघालं. दुसरीकडे महाविकास आघाडीने या विरोधात जशास तसं उत्तर दिल्याचं दिसलं नाही. या घोषणांमुळे शहरी आणि ग्रामीण भागात हिंदू मतदार जाती-पातीच्या पलीकडे महायुतीच्या मागे उभा राहिल्याचं या माध्यमातून दिसून येत आहे. तसेच महाविकास आघाडीच्या विरोधात प्रचार करताना विषेत: उद्धव ठाकरे यांच्या विरोधात महायुतीने 'वोट जिहाद'चा आरोप केला होता. तसेच महाविकास आघाडी 'वोट जिहाद'करत असेल तर आम्हाला 'धर्मयुद्ध' करावंच लागेल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात 'धर्मयुद्ध' शब्दावरून चांगलंच 'महाभारत' रंगलं होतं. त्यामुळे या घोषणा निवडणुकीत महत्वाच्या ठरल्या आहेत.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा जोरगार लावून धरला होता. त्यामुळे कुठेतरी मराठा मतदार महायुतीपासून बाजूला जाण्याची भिती व्यक्त केली जात होती. मात्र, तसं होऊ नये, याची काळजी महायुतीने विषेत: भारतीय जनता पक्षाने ओबीसी मतांची एकजूट कशी राहील? याची काळजी घेत निवडणुकीच्या काळात राज्यातील जवळपास सर्वच मतदारसंघात ओबीसी संघटनाच्या नेत्यांच्या बैठका घेत मतांचं ध्रुवीकरण होऊ नये याची पुरेपूर काळजी भाजपाने घेतल्याचं बोललं जातं. तसेच माधव हा पॅटर्न देखील या निवडणुकीत महत्वाचा ठरल्याचं बोललं जातं.

लोकसभा निकालात धक्का बसल्यानंतर भाजपाने सूक्ष्म नियोजन केल्याचाही फायदा झाल्याचं पाहायला मिळत आहे.

## राज्यात भाजपाच्या दणदणीत विजयाचा भाजपा जिल्हा जालना च्या वतीने फटाके फोडून विजयी जल्लोष!

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता



पक्षाला व महायुतीला मिळालेल्या यशामुळे जालना येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयासमोर कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी फटक्याची आतिशबाजी करून पेढे वाटून जल्लोष साजरा केला.

मिळालेले यश हे देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रमुख श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांनी केलेल्या परिश्रमाचे हे यश असल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्यात मिळालेला विजय हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा विजय आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशभरात केलेल्या विकास कामांमुळे जनतेचा त्यांच्यावरील विश्वास वाढला आहे. त्यांच्या हातात देश सुरक्षित आहे. विविध योजना आणून सर्वसामान्य जनतेला न्याय दिल्याने हा विजय मिळाला आहे. आजचा दणदणीत निकाल पक्षाच्या सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाला प्राधान्य देऊन विकास कामांचे फळ आहे.

यावेळी विजय कामड, अर्जुन गेही, धनराज काबलीये, रविंद्र अग्रवाल, गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी, सुनील खरे, राजेंद्र भोसले, अमोल कारंजेकर, सुभाष सले, राजू गवई, आनंद झारखंडे, बाबुराव भवर, तुलजेश चौधरी, प्रमोद गंडाळ, सुदर्शन काळे, सतीशचंद्र प्रभू, संतोष खंडेलवाल, सिद्धेश्वर हसबे, बद्री भसांडे, सेवक नारीयालवाले, निलेश गवळी, डोंगरसिंग साबळे, रोहित नलावडे, चेतन देसरडा, शाम जाधव, राजाराम जाधव, उद्धव ढवळे, मीना गायकवाड, समर्पणविजय सेनानी, सुधाकर शिंदे, नवनाथ म्हस्के, मदन गवारे, अकबर परसूवाले, जुनेद मुर्झा, मनोज इंगळे, सागर वाहूळकर, रमेश गोगडे, लक्ष्मण कुमावत, शेख इमाम, शाम उगले, सागर भानुशाली, यांच्यासह असंख्य भाजपा कार्यकर्ते या विजय उत्सवात सहभागी झाले होते.

# परतूर विधानसभा मतदार संघातून बबनराव लोणीकर विजयी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघावर महायुतीने विजय मिळविला असून यात प्रामुख्याने परतूर मतदार संघात अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत आपला किल्ला अभेद्य ठेवत बबनराव लोणीकर यांनी विजय मिळविला आहे. बबनराव लोणीकर यांना ७००७५ मते मिळाली आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) उमेदवार आसाराम बोराडे यांना ६४९८७ मते मिळाली असून अपक्ष उमेदवार सुरेशकुमार जेथलिया यांनी ५३५८७ मते घेत तिसऱ्या क्रमांकावर राहिले आहे.



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी ९९-परतूर मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील जवाहर नवोदय विद्यालय, अंबा, ता. परतुर येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. ९९-परतूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना ७०,६५९ मते मिळाली. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे.पाटील) यांना ६५,९१९ इतकी मते मिळाली. यात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) हे ४,७४० मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रतिभा गोरे यांची उपस्थिती होती.

अहेमद महमद शेख बहुजन समाज पार्टी ६९२, आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे.पाटील ) शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे ) ६५९१९, बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) भारतीय जनता पार्टी ७०६५९, आसाराम सखाराम राठोड पीपल्स पार्टी ऑफ इंडीया (डे.) १२७९ कृष्णा त्रिबंकराव पवार ऑल इंडीया हिंदुस्थान काँग्रेस पार्टी १०४५, जाधव श्रीराम बन्सीलाल जय सेवालाल बहुजन विकास पार्टी ८०२, रामप्रसाद किसनराव थोरात वंचीत बहुजन आघाडी २९८१०, अग्रवाल मोहनकुमार हरिप्रसाद अपक्ष १६३३, अजहर युनुस शेख अपक्ष, ८१२, जेथलिया सुरेशकुमार कन्हैयालाल अपक्ष ५३९२१, नामदेव हरदास चव्हाण अपक्ष ९९७, नोटा ११६३.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.